सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे
नवीन मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१
दुरध्वनी क्रमांक ०२०-२६१२२८४६/४७ E-mail- commcoop 2011 @gamil.com

जा क्र. ना.बँका/१-सआ/ विटा मर्चंट बँक/कलम ८३/आ/सन २०१८/ ५५० दिनांक ७ /३/२०१८

## महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ८३ (१)अन्वये आदेश

ज्या अर्थी, दि विटा मर्चंट्स को-ऑप.बँक लि., विटा,ता.खानापूर, जि.सांगली(यापुढे `बँक `` असे उल्लेखण्यात येईल) ही बँक महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० व त्याखालील नियम १९६१ अन्वये नोंदविण्यात आलेली सहकारी बँक असून, तिचा नोंदणी क्रमांक ७६४१ व नोंदणी दिनांक १४/१२/१९३६ असा आहे. सदर बँकेस बँकिंग व्यवसाय करण्याचा परवाना भारतीय रिझर्व्ह बँकेकडून यु.बी.डी/एम एच/८४८/पी दि. १४/२/१९८७ ने मिळालेला आहे;

आणि ज्या अर्थी, सदर बँकेचे कामकाज महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम , १९६० व त्याखालील नियम १९६१ , बँकींग रेग्युलेशन ॲक्ट १९४९, बँकेचे मंजूर उपविधी, शासन, या कार्यालयाचे आणि भारतीय रिझर्व्ह बँक यांनी वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश, निर्देश आणि मार्गदर्शक सुचना यानूसार करणे हे बँकेच्या व्यवस्थापनास आवश्यक व बंधनकारक आहे;

आणि ज्या अर्थी, सदर बँकेची सन २०१५-१६ या वर्षाची रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांनी केलेल्या तपासणीचा अहवाल आणि बँकेचा सन २०१५-१६ या आर्थिक वर्षाचे वैधानिक लेखापरिक्षण अहवाल यामध्ये बँकेने रिझर्व्ह बँकेच्या निकषानूसार भांडवल पर्याप्ततेचे प्रमाण न राखणे, एनपीएचे वाढते प्रमाण, वैयक्तिक व सामुहीक कर्जमर्यादेचे उल्लंघन करणे, बँकेस सातत्याने होणारा तोटा, संचालक मंडळाकडील कर्ज थकबाकी, कर्ज वसूलीचे असमाधानकारक प्रमाण, इ. दोष आढळून आलेले आहेत;

आणि ज्या अर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८३(१) मध्ये निबंधकास स्वत:हून कलम ८१(५ ब) मधील विशेष अहवालाच्या आधारे संस्थेची रचना, तिचे कामकाज आणि तिची आर्थिक स्थिती यांची चौकशी करण्याची तरतूद आहे:

त्या अर्थी, रिझर्व्ह बँकेचा तपासणी अहवाल व वैधानिक लेखापरिक्षण अहवाल यामध्ये आढळून आलेल्या अनियमिततेबाबत चौकशी करणे क्रमप्राप्त झाले आहे . सबब पुढीलप्रमाणे आदेश देत आहे.

### आदेश

मी, डॉ. आनंद जोगदंड , अपर आयुक्त व विशेष निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे, मला प्राप्त झालेल्या अधिकारानूसार, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८३(१) अन्वये दि विटा मर्चंट्स को-ऑप.बँक लि., विटा, ता.खानापूर, जि.सांगली या बँकेची या आदेशाचे संलग्न परिशिष्ट `अ` मध्ये नमूद केलेल्या मुद्यांबाबत चौकशी करणेसाठी श्री.प्रकाश अष्टेकर, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सांगली यांना प्राधिकृत करीत आहे.

प्राधिकृत चौकशी अधिकारी यांनी चौकशीचे कामकाज, महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चा नियम ७१ मधील तरतूदीस अनुसरुन पुर्ण करुन स्वयंस्पष्ट व मुद्देनिहाय चौकशी अहवाल, निरीक्षण व कारणमिमांसेसह आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यासह सदर आदेशाचे दिनांकापासून तीन महिन्यात सादर करावा.

प्राधिकृत चौकशी अधिकारी यांना सदर चौकशीकरिता रु १०,०००/- (अक्षरी रु. दहा हजार फक्त) एवढी फी मंजूर करण्यात येत आहे. सदर रकमेत चौकशी अधिकारी यांचे मानधन, स्टेशनरी व



Scanned by CamScanner

पोस्टेज यांचा समावेश आहे. उक्त बँकेने रु.१०,०००/- (अक्षरी रुपये दहा हजार फक्त) इतकी रक्कम या कार्यालयाचे लेखा शाखेकडे त्वरीत जमा करावी.

चौकशी फी कोणाकडून किती प्रमाणात वसूल करणेत यावी याबाबत प्राधिकृत चौकशी अधिकारी यांनी त्यांचे अहवालामध्ये सकारण निश्चिती करावी. चौकशीच्या प्रगतीचा अहवाल दरमहा सादर करावा.

सदरचा आदेश आज दि. ७/३/२०१८ रोजी माझे स्वाक्षरी व कार्यालयीन मुद्रेनिशी पारीत केला आहे.

(डॉ.आनंद जोगदंड)
अपर आयुक्त व विशेष निबंधक,
सहकारी संस्था,महाराष्ट्र राज्य, पुणे

पुणे
दिनांक:- ७ /३/२०१८

**प्रति,**
श्री.प्रकाश अष्टेकर, प्राधिकृत चौकशी अधिकारी (कलम ८३) दि विटा मर्चंट्स को-ऑप.बँक लि., विटा, ता.खानापूर, जि.सांगली तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सांगली

**प्रत माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी :-**
मुख्य कार्यकारी अधिकारी, दि विटा मर्चंट्स को-ऑप.बँक लि., विटा, यशवंत नगर, साळशिंगे रोड, विटा ४१५ ३११ ता.खानापूर, जि.सांगली

चौकशी कामकाजासाठी प्राधिकृत चौकशी अधिकारी यांना आवश्यक ते सर्व दप्तर विनाविलंब उपलब्ध करुन दयावे. तसेच चौकशी खर्चापोटी रु. १०,०००/- या कार्यालयाचे लेखा शाखेत तातडीने जमा करण्याची कार्यवाही करावी.

**प्रत माहितीस्तव :-**
१.विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, (प्रशासन/लेखापरिक्षण), विभाग कोल्हापूर
२.जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सांगली
३.महाप्रबंधक, डिपार्टमेंट ऑफ को -ऑपरेटिव्ह बँक सुपरव्हीजन, मुंबई क्षेत्रीय कार्यालय, सी ८,बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा पुर्व, मुंबई ४०० ०५१.
४. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि., मुंबई
५. अध्यक्ष/मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य नागरी सहकारी बँक फेडरेशन/ असोसिएशन लि.मुंबई
५.अध्यक्ष/मुख्य कार्यकारी अधिकारी, सांगली जिल्हा नागरी सहकारी बँक असो. लि.सांगली

अपर आयुक्त व विशेष निबंधक,
सहकारी संस्था,महाराष्ट्र राज्य, पुणे

Scanned by CamScanner